RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक १२०] मंगळवार, सप्टेंबर ८, २०२६/भाद्रपद १७, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ५१३

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक ८ सप्टेंबर, २०२६.

### अधिसूचना

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम.**

क्रमांक याचिका-२०२६/प्र.क्र.२०/ई-१५५५१७२/पं.रा.२.— महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (सन १९५९ चा अधिनियम क्र. ३) याच्या कलम १८२ च्या पोट-कलम (१) अन्वये तसेच उक्त अधिनियमाच्या कलम १५१ च्या पोट-कलम (१) मधील खंड (अ) च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्यास सक्षम करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, तसेच या बाबतीत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या सर्व अधिसूचना व आदेश अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम १५१ च्या पोट-कलम (१) मधील खंड (अ) च्या परंतुकान्वये ग्रामपंचायतीवर प्रशासक नियुक्त करण्यासाठी शासनास प्रदान करण्यात आलेले अधिकार, संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास त्यांच्या अधिकारक्षेत्रासाठी प्रत्यायोजित करीत आहे आणि पुढीलप्रमाणे निर्देश देत आहे की :—

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने, ज्या ग्रामपंचायतीची मुदत समाप्त झाली आहे आणि प्रशासकीय अडचणींमुळे सदर ग्रामपंचायतीची निवडणूक घेता आलेली नाही, अशा ग्रामपंचायतीवर विस्तार अधिकारी (कृषी), विस्तार अधिकारी (आरोग्य), विस्तार अधिकारी (शिक्षण), विस्तार अधिकारी (पंचायत) किंवा इतर कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नियुक्ती करावी. अशा प्रशासकाची नियुक्ती ही अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा ग्रामपंचायत स्थापनेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील.

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या आदेशानुसार व त्यांच्या नावाने,

**वर्षा मुं. भरोसे,**
शासनाच्या सहसचिव.

**RURAL DEVELOPMENT DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 8th September, 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT.

No.Yachika-2026/C.R.20/E-1555172/P.R.2.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 182 read with the proviso to clause *(a)* of sub-section (*1*) of section 151 of the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959) and of all other powers enabling it in that behalf and in supersession of all earlier notifications and orders issued in this behalf, the Government of Maharashtra hereby delegates, power conferred upon it under the proviso to clause *(a)* of sub-section (*1*) of section 151 of the said Act to appoint administrator on the Village Panchayat, to the Chief Executive Officer of the Zilla Parishad within his jurisdiction, and directs as follows, namely :—

The Chief Executive Officer of the Zilla Parishad shall appoint Extension Officer (Agriculture), Extension Officer (Health), Extension Officer (Education), Extension Officer (Panchayat) or any other Government officer, as an Administrator of the Village Panchayat who's term has expired and the elections of the said Village Panchayat could not be held due to administrative difficulties, for a period of six months from the date of publication of this notification in the *Maharashtra Government Gazette* or till the completion of the election process for constitution of the Village Panchayat, whichever is earlier, by superseding earlier orders issued in this behalf.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VARSHA M. BHAROSE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.